**<u>नि.दि.दा.क्र.७९/२०१०</u>.**
नि.क्र.१९१ लगत.
दि.१५.०२.२०२५

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथेवर जबाबः</u>–**

नावः– **<u>विशाल चंद्रकांत मोरे</u>.**

८. <u>माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत.

(एस.ए.विराणी)
दि. १५.०२.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

**<u>पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. बी. चव्हाण यांच्यामार्फत शपथेवर सुरुः</u>–**

९. आता मला दाखविण्यात आलेला नि.१९५/१ वरील कागद हा मला वादी क्र. १अ, १ब, १क, १ड, २क, ३अ ते ३क, ४, ५अ ते ५ब आणि ६ ते ८ यांनी दि. ०५.०२.२०२४ रोजी करुन दिलेले कुलमुखत्यारपत्र दस्त क्र. ३४२१/२०२४ नोटराईज्ड दस्ताची अस्सल प्रत आहे. त्यावर कुलमुखत्यारपत्र लिहून घेणार म्हणून माझी सही आहे. व लिहून देणार म्हणून वर नमूद वादींची सह्या व अंगठा आणि फोटो आहेत. त्यावर नोटरी यांची सही व शिक्का आहे. सोबत सर्वांचे आधारकार्ड जोडलेले आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.२२७</u>** देण्यात येते.
**<u>पुढील सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १अ आणि १५ तर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही. देशमुख यांच्यामार्फतः</u>–**

१०. प्रस्तुतचा दावा हा माझे वडील आणि चुलते यांनी दाखल केला होता. दावा दाखल झाल्यानंतर माझे वडील आणि चुलते मयत झालेले आहेत. माझ्यापूर्वी सिध्दार्थ कांबळे यांना वादींनी मुखत्यारपत्र करुन दिले होते. सिध्दार्थ आजदेखील

हयात आहेत. सिध्दार्थने मला करुन दिलेले मुखत्यारपत्र न्यायालयात दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी माझे मुखत्यारपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वीचे मुखत्यारपत्र आजतागायत रद्द केलेले नाही. साक्षीदार म्हणतो तो मुखत्यारधारक न्यायालयात हजर राहत नव्हता म्हणून मी माझे मुखत्यारपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील आणि चुलते नोकरीसाठी मुंबईला गेल्यामुळे आम्ही सर्वजण मुंबईलाच स्थायिक झालो. साक्षीदार म्हणतो एक चुलते पुण्याला स्थायिक आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावी कुणीच स्थायिक नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा जन्मदेखील मुंबई येथेच झाला. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे सर्व वारस हे कायमचे पुणे आणि मुंबई येथेच स्थायिक आहेत. सर्वप्रथम माझे मोठे चुलते काशिनाथ राघोबा मोरे यांनी दावा दाखल केला होता त्यांच्यानंतर माझे दुसरे चुलते विश्वनाथ राघोबा मोरे यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. काशिनाथ यांनी सर्वप्रथम दौंड कोर्टात २००१ ते २००५ या दरम्यान दाखल केला होता. त्या दाव्याचे कागदपत्र याकामी हजर केलेले नाही. प्रस्तुतचा दावा हा माझ्या चुलत्यांनी गट नं. ९२४ मधील ६ एकर २० गुंठे या जागेसाठी केलेला आहे. गट नं. ९२४ चे एकूण क्षेत्र २५ एकर इतके आहे. गट नं. ९२४ च्या चतुःसीमा मी सांगू शकत नाही. आमच्या मालकीचे ६ एकर २० गुंठे या क्षेत्राच्या चतुःसीमादेखील मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीला माझ्या वडींलांचे व चुलत्यांचे नाव नाही. त्यांचे नाव १९८५–८६ पासून दावा मिळकतीला लागलेले नाही.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने सदर साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-
**(एस.ए.विराणी)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

दि. १५.०२.२०२५.